पीएच.डी. संशोधन आराखडा

कृषी उत्पन्न बाजार समितीचे शेती व शेतकऱ्यांच्या विकासातील योगदान- उदगीर व मुखेड तालुक्याचा तुलनात्मक अभ्यास (वर्ष २००५-०६ ते २०१४-१५)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. (विद्या वाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

श्री. ज्ञानोबा व्यंकटराव मुंढे

(एम.ए., बी.एड., एम.फिल)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एल.एच. पाटील

(एम.ए. पीएच.डी.)

अर्थशास्त्र विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

अभ्यासकेंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

जून २०१५

प्रस्तावना:

भारत हा कृषिप्रधान देश असून, कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही जवळपास 60% लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवरच भागविला जातो. त्यात कोरडवाहू शेतीचा वाटा मोठा असून बहुतांश शेती ही मान्सुनवर आधारित आहे. म्हणून भारतीय शेती म्हणजे मान्सुनचा जुगार असेही म्हटले जाते.

आजच्या या स्पर्धेच्या युगात कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यामुळे अलिकडच्या काळात काही वर्षामध्ये कृषीक्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. 'पिकते ते विकण्याऐवजी विकते ते पिकवण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढू लागलेला आहे.' म्हणजेच थोडक्यात आजचा शेतकरी ग्राहकांच्या मागणीनुसार त्याला जी गुणवत्ता आवश्यक आहे त्या गुणवत्तेची उत्पादन घेऊ लागलेला आहे. आतापर्यंत फक्त पिकविणे इतकेच शेतकऱ्यांच्या हातात होते परंतु आज शेतकरी स्वतःच त्याने उत्पादित केलेल्या मालाचे विपणन करू लागलेला आहे.

अलिकडील काळात दुष्काळात अडकलेल्या शेती व्यवसायाला आधार देण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत बदल करून सध्या देशाला गरज असलेल्या अन्नधान्याच्या उत्पादन वाढीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्या देशात पिकलेल्या मालाला जगाच्या बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांना अनेक सवलती दिल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय फळबाग मोहिम सुरू केली आहे. फळबाग लागवड हलक्या व मध्यम जमिनीत आणि कमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशात सुद्धा करता येते. डाळींब, बोर, पपईसारखी फळझाडे अशा प्रदेशात घेणे शक्य आहे. म्हणून शेतकऱ्यांना या स्पर्धेत टिकायचे असेल तर फळ उत्पादनाशिवाय पर्याय नाही. सद्यःस्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. आत्महत्यांचे मूळ कारण कर्जबाजारीपणा हेच आहे. यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी नियोजनबद्ध व आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून निर्यातक्षम कृषी उत्पादने घेणे गरजेचे आहे.

विषय निवडीचे महत्त्व :

कृषी हा लातूर व नांदेड जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अर्थव्यवस्थेत शेती उत्पादनाचे प्रमाण किती आहे? शेतकऱ्याने उत्पादीत केलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळतो

आहे का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येला शेतीच्या माध्यमातून रोजगार मिळतो. अप्रत्यक्षरित्या लोकांच्या हाताला काम दिल्याने सामाजिक शांतता व सुव्यवस्था टिकून राहण्यास मदत होते.

शेतकरी आणि व्यापारी यांच्यातील मध्यस्थांची भूमिका स्विकारून कृषी क्षेत्रामध्ये पारदर्शकता आणण्याचे काम कृषी उत्पन्न बाजार समिती करते. शेतकरी शेतीमध्ये रात्रंदिवस काबाडकष्ट करतो पण त्याच्या जीवनमानाचा दर्जा सुधारलेला पहावयास मिळत नाही.

उदगीर व मुखेड तालुक्याचा विचार केला तर ग्रामीण भागात अनेक प्रकारच्या समस्या उग्र रूप धारण करत आहेत. उदा : आर्थिक विषमता, दारिद्र्य, बेकारी इ. अशा समस्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध सोयी सुविधा मिळवून देऊन शेतमालाला योग्य भाव मिळवून देवून कमी करता येतील. म्हणून संशोधकाने सदरील विषयाची निवड केलेली आहे.

संशोधन पद्धती :

संशोधन पद्धतीचा विचार केल्याशिवाय संशोधनात वस्तुनिष्ठता येत नाही. म्हणून संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. संशोधन पद्धती म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे व तथ्ये परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधासाठी संशोधकाने संशोधनाच्या एकूण चार पद्धतींपैकी सदरील संशोधन विश्लेषणासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. सामुग्री संकलनानंतर त्यातील महत्त्वपूर्ण तथ्यांचे वर्गीकरण करून तथ्यांचे विवेचन व निर्वाचन करण्यात येणार आहे व त्यावरुन वस्तुनिष्ठ निष्कर्षांची मांडणी करण्यात येणार आहे.

संशोधकाने प्राथमिक माहिती जमविण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखत पद्धत व प्रश्नावली अनुसूची, निरीक्षण या प्राथमिक स्रोतांद्वारे तथ्य संकलित केली जाणार आहेत. आवश्यकतेनुसार अप्रत्यक्ष मुलाखत पद्धतीचा विचार करण्याचे ठरविले आहे. तर दुय्यम माहिती, पुस्तके, वर्तमानपत्रे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रे, संशोधन अहवाल, मासिके, विविध प्रकारचे अहवाल याद्वारे मिळविले जाईल. सदरील संशोधनामध्ये आवश्यक तेथे समांतर माध्य व निर्देशांक इत्यादींचा वापर केला जाईल.

नमुना निवड :

नमुना निवड पद्धतीनुसार संशोधनासाठी शेतकऱ्यांची निवड केली जाणार आहे. थोडक्यात विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रातिनिधिक एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

उदगीर व मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधकाने यादृच्छिक नमुना निवड पद्धतीमधील लॉटरी पद्धतीनुसार उदगीर तालुक्यातील 100 शेतकरी व मुखेड तालुक्यातील 100 शेतकरी असे एकूण 200 शेतकरी निवडले जाणार आहेत व संशोधन पूर्ण करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधनाची गृहितके :

गृहितकांच्या शिवाय संशोधकाचे संशोधन कार्य पूर्णत्वास जात नसते किंवा असे म्हणण्यापेक्षा त्याला वैज्ञानिक कसोटीचा आधार नसतो. संशोधन प्रक्रियेत संशोधक हा प्रवासी तर गृहितके हे मार्गदर्शक असतात. थोडक्यात संशोधन कार्याला निश्चित दिशा देण्यासाठी गृहितके महत्त्वाची असतात. गृहितके हा संशोधनाचा पाया असतो. कारण या पायाभूत आधारामुळेच संशोधकाला निरीक्षण करण्याची क्षमता प्राप्त होते आणि त्या दिशेने तो आपले कार्य पुढे चालू ठेवत असतो.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी संशोधकाने खालील गृहितके निश्चित केली आहेत.

1) कृषी क्षेत्राच्या विकासात कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा अधिक वाटा आहे.
2) कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होतो.
3) कृषी उत्पन्न बाजार समित्यांमुळे खुल्या बाजारावर नियंत्रण येते.
4) कृषी उत्पन्न बाजार समित्यांमुळे व्यापार, बाजारभाव इत्यादींमध्ये पारदर्शकता येते.

संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधन करीत असताना संशोधकास संशोधनासाठी योग्य विषय व्यवस्थित स्वरूपात मांडणे हे संशोधनाच्या प्राथमिक अवस्थेत अत्यंत महत्त्वाचे असते. संशोधकाने निवडलेला विषय केवळ परिक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा असला पाहिजे असे नाही, तर तो सामाजिक व आर्थिक बाजूने परिक्षणात्मक असावा. त्यासाठी दोन कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा तुलनात्मक

अभ्यास करून कोणते अनुकूल व प्रतिकूल परिणाम घडले हे अभ्यासण्यासाठी संशोधकांनी पुढील उद्दिष्टे आखली आहे.

प्रस्तुत संशोधनाचा अध्ययन विषय 'कृषी उत्पन्न बाजार समितीचे शेती व शेतकऱ्यांच्या विकासातील योगदान एक तौलनिक अभ्यास' हा असून या संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1) कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना पुरविलेल्या सुविधांचा अभ्यास करणे.

2) उदगीर व मुखेड कृषी उत्पन्न बाजार समित्यांची तुलना करणे.

3) उदगीर व मुखेड कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या खर्चाची तुलना करणे.

4) कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजामुळे कृषी विपणन पद्धतीमध्ये पारदर्शकता आलेली आहे का? याचा अभ्यास करणे.

5) कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधकाने संशोधनासाठी निवडलेला विषय उदगीर व मुखेड कृषी उत्पन्न बाजार समिती एवढ्यापुरता मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी हा सन 2005-06 ते 2014-15 एवढा आहे. संशोधन करून निष्कर्ष काढणे सोपे जावे या हेतूने अध्ययनाचा कालावधी 10 वर्षांचा घेण्यात आल्याने या विषयाच्या व्याप्तीला मर्यादा आली व त्यानुसार बाजार समित्यांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत. सदरील संशोधनासाठी उदगीर व मुखेड तालुक्याचा विचार केलेला आहे. इतर भौगोलिक क्षेत्रासाठी हे निष्कर्ष लागू होतीलच असे नाही.

प्रकरण रुपरेषा :

कृषी उत्पन्न बाजार समितीचे शेती व शेतकऱ्यांच्या विकासातील योगदान एक तौलनिक अभ्यास विशेष संदर्भ उदगीर व मुखेड तालुका हा संशोधन अभ्यास एकूण सात प्रकरणात केला जाणार आहे.

1) प्रस्तावना :

आजच्या स्पर्धेच्या युगात कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यामुळे अलीकडच्या काळात काही वर्षांमध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण

महत्त्व प्राप्त झाले आहे. पिकते ते विकण्याऐवजी विकते ते पिकविण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढू लागलेला आहे.

2) संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन पद्धती :

प्रस्तुत प्रकरणामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती विषयी अनेक तज्ञ संशोधकांनी केलेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात येणार आहे. प्रस्तुत विषयावरील देशातील अभ्यास, महाराष्ट्रातील अभ्यास व मराठवाड्यातील अभ्यासाचा आढावा घेण्यात येणार आहे.

3) उदगीर व मुखेड तालुक्याची माहिती :

उदगीर व मुखेड तालुक्यातील लोकसंख्या, बाजार समित्यांची माहिती, तालुक्याचे क्षेत्रफळ, शेती व शेतकऱ्यासंबंधीची माहिती प्रस्तुत प्रकरणात घेतली जाणार आहे.

4) कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर व मुखेडच्या उत्पन्नाचा अभ्यास :

प्रस्तुत प्रकरणात कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर व मुखेड यांना कोणकोणत्या मार्गाने उत्पन्न मिळते जसे मार्केट फी, जनावर दाखले, व्याज व लाभांश, भूखंड भाडे, व्यापारी गाळे, इमारतीचे भाडे इत्यादी मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास केला जाणार आहे.

5) कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर व मुखेडच्या खर्चाचा अभ्यास :

प्रस्तुत प्रकरणात कृषी उत्पन्न बाजार समिती, उदगीर व मुखेड यांचा कोणकोणत्या मार्गावर खर्च झालेला आहे जसे- मार्केट यार्ड सफाई व पोषण यावरील खर्च, टपाल खर्च, लेखापरीक्षण फी, समारंभ व किरकोळ खर्च, कर्मचारी, सदस्य, वेतन व भत्ते यासाठी होणारा खर्च यासंबंधी आढावा घेतला जाणार आहे.

6) कृषी उत्पन्न बाजार समिती, उदगीर व मुखेडच्या उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक अभ्यास :

कृषी उत्पन्न बाजार समिती, उदगीर व मुखेड या दोन बाजार समित्यांपैकी कोणत्या बाजार समित्‍ीचे उत्पन्न व खर्च किती आहे याचा तुलनात्मक आढावा घेतला जाणार आहे.

7) निष्कर्ष व शिफारशी :

निष्कर्ष हा संशोधनातील शेवटचा व अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. निष्कर्षावर आधारित शिफारसी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाणार आहे.

संदर्भ सूची

1) कृषी अर्थशास्त्र - कवी मंडन
2) महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम 1963 व कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) नियम 1967
3) कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीर व मुखेड वार्षिक अहवाल
4) भारतीय अर्थव्यवस्था - दत्त सुंदरम्
5) महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ संकेतस्थळ
6) डॉ.सतिश दांडगे-भारतातील कृषी बाजार नियम आणि कायदे
7) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2005-06
8) साळुंके आर.एस., महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद दुसरी आवृत्ती 1999
9) खंदारे अर्थबोध-जागतिकीकरण कृषी क्षेत्रावरील अरिष्ट, फेब्रु.2005
10) Sing-Sadhu, Agricultural Problems in India, Himalaya Publishing House, Bombay, 1991, P.305
11) B.B. Mukherjee, Agricultural Marketing in India, Thacker Sprink and Company Ltd. (1937-1998)
12) K.R. Kulkarni, Agricultural Marketing in India, The Co-operative Book Depot, Bombay 1966
13) H.M. Sexena, Regulated Agricultural Markets, Rawat Publication, Delhi, 1985
14) Katare R.S., Thakare R.P. and Bourde S.G. Trend and Variability in the Price and Agrivals of Rise in Selected Market of Maharashtra State, Agricultural Situation in India, May 1983.

संशोधक
श्री.ज्ञानोबा व्यंकटराव मुंढे
एम.ए., बी.एड., एम.फिल

मार्गदर्शक
प्रा.डॉ.एल.एच. पाटील
एम.ए., पी.एच.डी.
अर्थशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर